माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

---

**क्रमांक-तक्रार-१५०/२०२५** दिनांक :- ०२.०४.२०२६

१. श्री. अरविंद प्रभुजी रामटेके, -- **तक्रारदार**
रा. लोनवाही, श्रीकृष्ण मंदिर रोड पाण्याच्या टाकीजवळ,
लोनवाही पो. सिंदेवाही, ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी,
प्रादेशिक परिक्षेत्र सिंदेवाही, ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर --**जन माहिती अधिकारी**

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, --**प्रथम अपिलीय अधिकारी**
(प्रादे व वन्यजीव) ब्रम्हपुरी वनविभाग, ब्रम्हपुरी

तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ नुसार आयोगास दिनांक ०५.०४.२०२४ रोजी (प्राप्त दिनांक ११.०४.२०२५) थेट तक्रार अर्ज सादर केला आहे. या तक्रार अर्जा मध्ये तक्रारदार यांनी "व्ही. ए. सालकर, जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) सिंदेवाही यांनी तक्रारदार यांच्या दिनांक २८.०२.२०२५ रोजीच्या माहिती अर्जातील माहिती दिली नाही. हया अगोदरच्या माहिती अर्जाची सुध्दा माहिती उपलब्ध असतांना सहज देण्यासारखी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे माहिती देण्याचे आदेश होऊनही आदेशाचे पालन जन माहिती अधिकारी यांनी केले नाही. माहिती दिली नाही." असे कारण नमूद करुन थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित झालेल्या अर्जदारास दाद मागण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९ (१) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीला कलम ७ चे पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) चा खंड (क) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत निर्णय प्राप्त झाला नसेल, किंवा यथस्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने जी व्यक्ती व्यथित झालेली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अशी मुदत संपल्यापासून किंवा असा निर्णय प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांमधील यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अशा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(६) अन्वये पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये केलेले अपील, ते मिळाल्याच्या दिनांकापासून यथास्थिती तीस दिवसांच्या आत किंवा ते दाखल केल्याच्या दिनांकापासून एकूण पंचेचाळीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत, कारणे लेखी नमूद करुन, निकालात काढण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९(३) अन्वये पोटकलम (१) खालील निर्णया विरुध्दचे दुसरे अपील, ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, केंद्रीय माहिती आयोगाकडे किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येईल.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी Chief Information Commissioner -Vs- State of Manipur (AIR २०१२ SC ८६४), यामध्ये सिव्हिल अपील क्रमांक १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर, दिनांक १२.१२.२०११ रोजी दिलेल्या आदेशामध्ये – The nature of the power under Section १८ is supervisory in character whereas the procedure under Section १९ is an appellate procedure and a person who is aggrieved by refusal in receiving the information which he has sought for can only seek redress in the manner provided in the stature, namely, by following the procedure under Section १९. This Court is, therefore, of the opinion that Section ७ read with Section १९ provides a complete statutory mechanism to a person who is aggrieved by refusal to receive information. Such person has to get the information by following the aforesaid statutory provisions." असे स्पष्ट केले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश (Judgment) लक्षात घेता असे स्पष्ट होते की, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ मधील तरतुदीनुसार केलेल्या तक्रारी ऐवजी कलम ६ अंतर्गत केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने व्यथीत झाल्यास, कलम १९ (१) नुसार प्रथम अपील व कलम १९(१) वरील निर्णय मान्य नसेल तर कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल करणे क्रमप्राप्त ठरते.

तसेच ज्या माहिती अर्जाच्या संदर्भात कलम १९ (३) अन्वये आयोगास व्दितीय अपील सादर करण्यात आले आहे व ज्या अपील प्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशा प्रकरणी तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल करणे अपेक्षित आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता आयोगास असे निदर्शनास आले आहे की, तक्रारदार यांनी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम ६(१) अंतर्गत दिनांक २८.०२.२०२५ रोजी संबंधित जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) सिंदेवाही यांचेकडे माहितीचा अर्ज दाखल केला. त्यानंतर तक्रारदार यांनी "माहिती अप्राप्त" असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, ब्रम्हपुरी वनविभाग, ब्रम्हपुरी यांचेकडे दिनांक ०५.०४.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९.०५.२०२५ रोजी सुनावणी घेवून "अपिलार्थी यांचे जोडपत्र-अ दिनांक २८.०२.२०२५ रोजीचा माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) सिंदेवाही यांनी कार्यालयाचे पत्र क्रमांक/वपअ/प्रादे./सिंदे/४७, दि. २१.०३.२०२५ रोजीचे पत्रान्वये अर्ज नाकारण्यात येत असल्याबाबत कळविण्यात आले आहे. अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे" असे नमूद करुन आदेश पारीत केले. तद्नंतर तक्रारदार यांनी "व्ही. ए. सालकर, जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) सिंदेवाही यांनी तक्रारदार यांच्या दिनांक २८.०२.२०२५ रोजीच्या माहिती अर्जातील माहिती दिली नाही. हया अगोदरच्या माहिती अर्जाची सुध्दा माहिती उपलब्ध असतांना सहज देण्यासारखी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे माहिती देण्याचे आदेश होऊनही आदेशाचे पालन जन माहिती अधिकारी यांनी केले नाही. माहिती दिली नाही." असे कारण नमूद करुन आयोगाकडे कलम १८ (१) अन्वये थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे. यावरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी कलम १९ (३) अंतर्गत उपलब्ध असलेल्या संपूर्ण वैधानिक कार्यप्रणालीचा अवलंब न करता कलम १८ चा वापर केला आहे.

तक्रारदार यांची कलम १९(३) अंतर्गत कार्यप्रणालीचा अवलंब न करता अशा पध्दतीने तक्रार दाखल करण्याची कृती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विसंगत ठरते.

तथापि, तक्रारकर्ता यांच्या दिनांक ११.०४.२०२५ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) सिंदेवाही यांना पत्र क्र. रामाआ/त.क्र. १५०/२०२५/तक्रार शाखा/२६७१, दिनांक ३०.०५.२०२५ अन्वये तक्रारदार यांच्या दिनांक २८.०२.२०२५ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात केलेल्या

कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.) परिक्षेत्र सिंदेवाही यांनी दिनांक २८.०७.२०२५ च्या पत्रान्वये (प्राप्त दिनांक ३०.०७.२०२५) आयोगास अहवाल सादर करुन त्यामध्ये, "तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.) सिंदेवाही यांनी अर्जदार, श्री. अरविंद रामटेके, रा. लोनवाही यांचेकडील दिनांक २६.०२.२०२५ व दि. २८.०२.२०२५ च्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती दिनांक २१.०३.२०२५ अन्वये माहिती अधिकार कायद्यातंर्गत पुन्हा-पुन्हा माहितीची मागणी केल्याने जन माहिती अधिकारी अपिलांशी संबंधीत कर्मचारी सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचा मौल्यवान वेळ व इतर शासकीय कामकाज करण्यासाठी वेळ देणे शक्य होत नाही. उपरोक्त सर्व बाबी तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व मा. केंद्रीय माहिती आयोगाकडील निर्णय विचारात घेता अर्जदार यांनी माहिती अधिकार अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठया प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होवून शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल, असे माहिती अधिकार कायदयास अभिप्रेत नाही, असे प्राधिकरणाचे स्पष्ट मत झालेले आहे. वरील सर्व बाबीवरुन मागणी केलेली माहिती नाकारण्यात येवून तक्रारदारास पंजीकृत डाकेने कळविण्यात आलेले आहे.

अर्जदार, श्री. अरविंद प्रभुजी रामटेके, रा. लोनवाही यांनी माहिती नाकारण्यात आल्यामुळे मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव), ब्रम्हपुरी वनविभाग, ब्रम्हपुरी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर दोन्ही प्रथम अपील अर्जावर मा. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०.०५.२०२५ अन्वये सुनावणी घेवून आदेश पारीत केलेला आहे. मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव), ब्रम्हपुरी वनविभाग, ब्रम्हपुरी यांचेकडील प्राप्त आदेशानुसार अपील अर्ज निकाली काढण्यात आला असून आदेशात या कार्यालयास कोणत्याही प्रकारचे निर्देश अथवा सुचना देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे अर्जदार यांचेकडील दिनांक २६.०२.२०२५ व दि. २८.०२.२०२५ रोजीचे अर्जावर पुढे कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे उपलब्ध नस्तीमधील दस्ताऐवजावरुन दिसून येत आहे. तरी महोदय यांना विनंती करण्यात येते की, वरील सर्व बाबींचा विचार करता सदर तक्रारकर्ता यांनी केलेला अर्ज खारीज करण्यास विनंती करण्यात येत आहे." असे नमुद केले आहे.

सबब, जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.) परिक्षेत्र सिंदेवाही यांनी तक्रारकर्ता यांना जोडपत्र-अ च्या अनुषंगाने प्रतिसाद दिला आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना दिलेला प्रतिसादानुसार तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सिव्हिल अपील क्र. १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर दिलेले आदेशानुसार तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

ठिकाण : नागपूर
दिनांक: ०२.०४.२०२६

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

7 APR 2026

जा.क्र. २६८८ दि.

-

E:\SD \तक्रार शाखा\थेट तक्रारआदेश – रामटेके